**अर्जदारातर्फे वकील श्री. जे. जे. मांडवकर यांच्यामार्फत पुढील सरतपास शपथेवर सुरूः**

६) मी यादी निशाणी ५ सोबत कागदपत्रे दाखल केली आहेत. ते **निशाणी क्र.४१, ४२ व ४३** वर आहेत.

सरतपास पुर्ण.

**सामनेवाला क्र.१ विरुध्द – प्रकरण एकतर्फा**

**सामनेवाला क्र.२ करिता वकील श्री. अमित देखमुख यांच्यामार्फत उलटतपास सुरु–**

७) हे म्हणणे खरे आहे की दिनांक २७.०२.२०१६ रोजी मी माझ्या आईवडीलांसोबत जांभूळपाडा येथे गेली होती. हे म्हणणे खरे आहे की घरी परत येण्याकरिता आम्ही परळी नाका येथे येऊन थांबलो होतो. मला हे आठवत नाही की माझ्या वडीलांनी माझ्या आईला व भावाला मिनीडोअर रिक्षामध्ये बसविले. हे म्हणणे खरे नाही की मी वडीलांसोबत माझ्यासाठी खाऊ घेण्याकरीता रस्त्याच्या पलीकडे गेले होते. हे म्हणणे खरे आहे की मी रस्त्याच्या पलीकडे जात होते त्यावेळी अपघात झाला होता. हे म्हणणे खरे नाही की तो रस्ता चांगला नव्हता व खड्ड्यांचा होता. हे म्हणणे खरे नाही की मी रस्त्याच्या दोन्ही बाजूंना बघीतले नव्हते. माझ्याकडे येत असलेला टेम्पो हा अपघातापूर्वी मी बघीतला होता काय हे मला आठवत नाही.

८) हे म्हणणे खरे नाही की मी वाहतुकीकडे लक्ष न देता रस्ता ओलांडत होते व त्यामुळे हा अपघात झाला. हे म्हणणे खरे नाही की अपघात घडण्यामध्ये

टेम्पोचालकाची काहीही चुकी नव्हती.

९) अपघात घडला त्यावेळी मी ३ –या इयत्तेमध्ये शिकत होती. माझे शिक्षण इयत्ता १० वी अनुतीर्ण आहे. माझ्या शाळेचे प्रगती पुस्तक घरी असल्यास मी दाखल करू शकते. हे म्हणणे खरे नाही की अपघातामुळे माझ्या शिक्षणावर काहीही परिणाम झाला नाही. हे म्हणणे खरे नाही की मला आता कोणाच्याही आधाराशिवाय चालताफिरता येते. हे म्हणणे खरे नाही की मला माझी स्वतःची कामे स्वतः करता येतात. हे म्हणणे खरे आहे की मला बोललेले समजते व लिहिता वाचता येते. चांगले, वाईट यातील फरक मला समजतो.

१०६) हे म्हणणे खरे नाही की अपघात घडल्यानंतर मला डिस्चार्ज मिळाल्यावर या अपघातासंबंधाने मला पुन्हा दवाखान्यामध्ये जावे लागले नाही. हे म्हणणे खरे आहे की मी २०१७ पासून नंतर दवाखान्यात गेल्याबाबतची कागदपत्रे अभिलेखात दाखल केली नाहीत. ती कागदपत्रे मी दाखल केली नाहीत कारण ती कागदपत्रे मी आज सोबत आणली नाहीत. हे म्हणणे खरे नाही की शपथपत्रातील परिच्छेद क्र.३ व ४ मधील मजकूर हा मी खोटा सांगितलेला आहे.

६. हे म्हणणे खरे आहे की माझ्या उपचाराच्या वेळची देयके मी दाखल केलेली नाहीत. हे म्हणणे खरे नाही की सामनेवाला क्र.२ हे मला नुकसानभरपाई देण्यास जबाबदार नाहीत. टेम्पो चालकाकडे गाडी चालविण्याचा परवाना होता किंवा नाही हे मला आठवत नाही. सदर टेम्पो चालकाकडे गाडीचे परमीट व फीटनेस प्रमाणपत्र होते काय हे मला माहीत नाही. हे म्हणणे खरे नाही की मी खोटी साक्ष देत आहे.

सामनेवाला क्र.२ तर्फे उलटतपास पुर्ण.

**फेरतपास नाही**.

माझे समक्ष नोंदविले
श्रवणोत्तर स्विकृत

माणगाव
दिनांक : २५.०९.२०२५.

(एस. टी. भालेराव)
सदस्य,
मोटार अपघात दावा न्यायाधीकरण,
माणगाव–रायगड